# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२३

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### बेळगाव सीमा लढ्यात बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना शहीद दर्जा देण्याबाबत

**(१) ३७७५ (०३-०६-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेळगाव सीमा लढ्यासाठी दिनांक ८ फेब्रुवारी, १९६९ रोजी करण्यात आलेल्या तीव्र आंदोलनात बलिदान दिलेल्या ६७ हुतात्म्यांना शहीद दर्जा देण्याबाबतची मागणी मा.नगरविकास मंत्री यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ८ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने बेळगाव सीमा लढ्यात बलिदान दिलेल्या ६७ हुतात्म्यांना शहीद दर्जा देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक १७/१०/१९९७ रोजीच्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात सन १९५९ ते सन १९६९ या कालावधीत मुंबई येथे झालेल्या आंदोलनामध्ये ज्या अंदाजे ७० व्यक्तींनी हौतात्म्य पत्करले आहे, त्यांना "हुतात्मा" म्हणून जाहीर करावे. हुतात्म्यांच्या कुटुंबियांना (हयात असलेल्या त्यांच्या विधवा पत्नी, आई, वडील ह्यापैकी एका जवळच्या नातेवाईकास) रुपये १,०००/- मासिक निवृत्तीवेतन व इतर आर्थिक सवलतींचा (स्वातंत्र्य सैनिकांना मिळणाऱ्या) लाभ देण्यात येईल. मासिक निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र असलेल्या संबंधितांनी विहित नमुन्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मासिक निवृत्ती वेतनासाठी अर्ज करावयाचा असून संबंधित जिल्हाधिकाऱ्याने अर्जदार शासनाने लावलेल्या निकषांची पूर्तता करत असेल याची खातरजमा करून त्यांना मासिक निवृत्ती वेतन अदा करावयाचे आहे."असे आदेश निर्गमित केले होते. त्यानुसार दिनांक १७/१०/१९९७ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंदाजे ७० हुतात्म्यापैकी मुंबई जिल्हयात ७, मुंबई उपनगर २, पुणे १ व रत्नागिरी १ अशा एकूण ११ हुताम्यांच्या वारसदारांनी केलेल्या अर्जाची, संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने तपासणी करुन त्यांना "हुतात्मा" घोषित केले व निवृत्तीवेतन सुरु केले होते.

सध्यस्थितीत मुंबई आंदोलनातील मंजूर ११ लाभार्थ्यांपैकी ५ लाभार्थी (मुंबई जिल्ह्यात १, मुंबई उपनगर २, पुणे १, रत्नागिरी १) व कर्नाटक सीमा भागातील (कोल्हापूर) ११ हुतात्म्यांपैकी ९ लाभार्थी अशा सध्या हयात असलेल्या एकूण १४ लाभार्थ्यांना दिनांक २१/०४/२०१५ च्या शासन निर्णयान्वये स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे दिनांक ०२/१०/२०१४ पासून मासिक निवृत्तीवेतन रुपये १०,०००/, वार्षिक प्रवासभत्ता रुपये ५००/- व मागणी झाल्यास वार्षिक तात्कालिक कारणास्तव मदत म्हणून रुपये ५०००/- देण्यात येते.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## मुटकुळे गावातील (जि.हिंगोली) विद्युत अभियंत्याने शेतकऱ्यांवरच अनधिकृत वीज वापरल्याचे खोटे गुन्हे दाखल केल्यामुळे शेतकऱ्यांनी अन्यायाविरूध्द सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाबाबत

**(२) ६१२३ (२३-११-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगाव व मुटकुळे (जि.हिंगोली) येथील शेतकऱ्यांकडून वीज अभियंता श्री.सुरेश सिंग राठोड यांनी १२ लाख रूपये घेऊन कंत्राटदाराच्या संगनमताने सुमारे ९० खांब उभे करून ९ रोहित्रे बसवून वीज पुरवठा सुरळीत केला होता परंतु सदरहू वीज पुरवठा अनधिकृतरित्या असल्याची बाब महावितरण कंपनी, हिंगोलीच्या वरिष्ठापर्यंत गेल्यानंतर शेतकऱ्यांचा वीज पुरवठा खंडित करून ज्यांनी वीज पुरवठा दिला त्याच अभियंत्याने शेतकऱ्यांविरूध्द सेनगाव पोलीस स्टेशनवर अनधिकृत वीज वापराचे गुन्हे दाखल केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहित्र आणि विजेचे खांब बाजारात मिळत नसल्यामुळे आणि वीज जोडणीचे काम अधिकृत आहे की अनधिकृत आहे हे माहिती नसल्यामुळे शेतकऱ्यांनी अभियंत्याकडे पैसे जमा केले होते परंतु महावितरण कंपनीच्या गैरकारभारामुळे शेतकऱ्यांवर नोंद झालेला गुन्हा तसेच दोषी अभियंत्याविरूध्द कायदेशीर कारवाई करावी या मागणीसाठी आणि शेतकऱ्यांच्या हळद, रब्बी पिकांना पाणी देण्याकरीता वीज जोडणी करुन देण्यासाठी हिंगोलीमध्ये २० हून अधिक शेतकऱ्यांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विनाविलंब वीज जोडणी करून दिल्याशिवाय तसेच संबंधित दोषी अभियंत्याविरोधात कारवाई केल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही असा आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी इशारा दिल्यामुळे महावितरण कंपनी, हिंगोलीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता, श्री.गणेश नरदेव यांनी शेतकऱ्यांबरोबर तडजोड करण्याचा प्रयत्न केल्याने संबंधित दोषींना महावितरण अधिकारी संरक्षण देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषीविरोधात कारवाई करुन शेतकऱ्यांवर झालेला अन्याय दूर करण्याकरीता शेतकऱ्यांना विनाविलंब वीज जोडणी देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०४-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे आडगाव मुटकुळे गावातील ९ शेतकऱ्यांनी अनाधिकृतपणे लॉकडाऊन कालावधीमध्ये (माहे मार्च-२० ते माहे सप्टे-२०) महावितरणकडे कृषीपंप वीज जोडणीसाठी ए-१ अर्ज न करता व कोणतीही तांत्रिक मंजुरी न घेता परस्पर त्यांच्या शेतात ९ विद्युत रोहित्र(१८ पोल), ११ केव्ही वाहिनीचे ११ पोल व लघुदाब वाहिनीचे ९ पोल अशी कामे उभारणी केल्याचे माहे ऑक्टोबर-२०२० च्या दरम्यान संबंधित कनिष्ठ अभियंता कनेरगाव नाका यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे सदर वीज पुरवठा खंडीत करुन संबंधित ९ शेतकऱ्यांवर कनिष्ठ अभियंता, कनेरगाव नाका यांनी पोलीस स्टेशन सेनगाव, जि.हिंगोली येथे प्रथम खबर अहवाल क्र.०३२८, दिनांक २२/१०/२०२० अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०२/११/२०२० रोजी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे बेमुदत उपोषण सुरु केले. तथापि, सदर शेतकऱ्यांनी अनधिकृत विद्युत रोहित्र उभारणीचे काम केल्यामुळे त्यांना रितसर वीज पुरवठ्याची आवश्यकता असल्यास कंपनीच्या नियमाप्रमाणे अर्ज करुन १.३ % सुपरव्हीजन चार्जेस अंतर्गत अंदाजपत्रकाची तांत्रिक मंजुरात करुन घ्यावी व सदर कामे अधिकृत विद्युत ठेकेदारामार्फत करुन वीज जोडणी करण्यात यावी असे महावितरण कंपनीमार्फत कळविण्यात आले. त्यानुसार शेतकऱ्यांनी दिनांक ०३/११/२०२० रोजी उपोषण मागे घेतले.

अनधिकृतपणे उभारणी केलेल्या कामाची महावितरण कंपनीकडून प्राथमिक चौकशी केल्यानंतर संबंधित कनिष्ठ अभियंता श्री.सुरेशसिंग मानसिंग राठोड, वरिष्ठ तंत्रज्ञ श्री.दत्ता अशोक अंभोरे आणि श्री.हनुमान नारायण जाधव या तीन कर्मचाऱ्यांवर दिनांक ०३/११/२०२० रोजी निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. कंपनीच्या नियमानुसार सदर कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी करुन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई (प्रत्येकी रुपये ५१,०००/-) करण्यात आली असून त्यांना महावितरणच्या सेवेत पूर्वपदावर घेण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी योजनेत अनियमितता केल्याबाबत

**(३) १२९२७ (३०-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक २६४७ ला दिनांक १८ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास पाटील यांनी सेवानिवृत्त होताना ३३ प्रकरणात गंभीर अनियमितता केल्याचे आढळल्याचा अहवाल चौकशी समितीने दिला असूनही याप्रकरणी कोणावरही कारवाई झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त टीडीआरला मंजूरी झोपडपट्टी घोषित नसतानाही योजनेला मंजूरी देणे, तीन ऐवजी सरसकट चार इतके चटई क्षेत्र बहाल करणे, झोपडपट्टीवासियांच्या नकळत विकासक बदलणे, झोपडपट्टीवासियांना विश्वासात न घेता योजनाच्या एकत्रिकरणाला मंजूरी, चटई क्षेत्र उपलब्ध नसतानाही

पार्किंग क्षेत्राला परवानगी इ. गंभीर अनियमितता समितीला आढळून आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास पाटील यांच्या जुहू येथील निवासस्थानाच्या कथित गैरव्यवहाराबाबतची फाईल झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण तसेच गृहनिर्माण विभागात उपलब्ध नसल्यामुळे प्राधिकरणाने निर्मलनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, तसेच तत्कालीन मुख्य सचिव यांनी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे जुहू येथील झोपु प्रकरण निदर्शनास आणून देवूनही सदर फाईल अद्याप गहाळ आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने फाईल गहाळप्रकरणी संबंधितांविरोधात जबाबदारी निश्चित करून दोषींवर तसेच झोपु योजनेतील अनियमिततेप्रकरणी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०२३) :** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विश्वास पाटील यांच्या सेवानिवृत्तीच्या शेवटच्या काही दिवसांत मंजूर केलेल्या ३३ प्रकरणांचा फेर आढावा उच्चस्तरिय समिती तर्फे घेण्यात आला आहे.
(२) उच्च स्तरिय समितीने आढावा घेतलेल्या प्रकरणांपैकी ७ प्रकरणांमध्ये अनियमितता आढळून आली. सदरहू ७ प्रकरणांपैकी २ प्रकरणांतील मंजुरी आदेश रद्द करण्यात आले असून एका प्रकरणांतील मंजुरी आदेश अंशत: रद्द करण्यात आले आहे. तर उर्वरित ४ प्रकरणांत मंजुरी रद्द करण्यात येऊन प्रकरणे फेरसादर करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.
(३) एकता रहिवासी संघ एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या योजनेची नस्ती गहाळ झाल्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून निर्मल नगर पोलीस ठाणे येथे दिनांक ३०/११/२०१७ रोजी तक्रार नोंदविण्यात आली. तर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विश्वास पाटील यांच्या जुहू येथील निवासस्थानाच्या कथित गैरव्यवहाराबाबतच्या गहाळ झालेल्या नस्तीचे पुन:गठन करुन नस्ती फेरसादर करण्यात आली आहे.
(४) या प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विश्वास पाटील, भाप्रसे यांनी पदावर कार्यरत असताना झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने त्यांची भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७ ते ११ मधील तरतुदींच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अनुसूचित जातीची पदे रिक्त असल्याबाबत

**(४) १३२७५ (३०-०३-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) राज्यात अनुसूचित जातीची सुमारे १६ हजारपेक्षा जास्त पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसुचित जातीची सदर पदे रिक्त रहाण्याचा कालावधी व कारणे काय आहेत,

(३) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने सदर रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०५-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) वित्त विभागाने वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याच्या दृष्टीने वित्त विभागाने सन २०१५, २०१६, २०१७, २०२० व सन २०२१ या कालावधीत सरळसेवा भरतीवर काही प्रमाणात निर्बंध घातलेले होते. त्यामुळे तसेच कोविडमुळे सरळसेवा कोटयात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग व अराखीव या सर्व प्रवर्गांमध्ये पदभरती करता आली नाही. त्यामुळे या प्रवर्गातील पदे रिक्त होती. तसेच पदोन्नतीमधील आरक्षण मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०४/०८/२०१७ च्या निर्णयान्वये रद्द ठरविल्याने त्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केलेली असून ती अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे पदोन्नतीमधील पदे रिक्त राहिली आहेत.

शासनाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात ७५,००० पदे भरण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील विविध विभागाच्या अखत्यारितील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास वेळोवेळी मागणीपत्र पाठविण्यात येत आहेत. तसेच जिल्हा निवड समित्यामार्फत पद भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच दिनांक ०७/०५/२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती कोटयामधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## मुंबई शहर व उपनगरात इमारत किंवा निवासी प्रकल्प उभा करताना भरावयाच्या प्रीमियम शुल्कात सवलत घेऊन त्या मोबदल्यात ग्राहकांचे मुद्रांक शुल्क (स्टॅम्पडयुटी) स्वत: भरण्याची ग्वाही देऊनही त्याचा बोजा ग्राहकांवर टाकून बांधकाम व्यावसायिकांनी ग्राहकांची तीन हजार कोटी रूपयांची केलेली फसवणूक

**(५) १३३६४ (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरात इमारत किंवा निवासी प्रकल्प उभा करताना भरावयाच्या प्रीमियम शुल्कात सवलत घेऊन त्या मोबदल्यात ग्राहकांचे मुद्रांक शुल्क (स्टॅम्पडयुटी) स्वत: भरण्याची ग्वाही देऊनही त्याचा बोजा ग्राहकांवर टाकून बांधकाम व्यावसायिकांनी ग्राहकांची तीन हजार कोटी रूपयांची फसवणूक केल्याचा आरोप मुंबई ग्राहक पंचायती केला असून यासंपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची महारेरा (महाराष्ट्र रिअल इस्टेट नियामक प्राधिकरण) यांचेकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवासी प्रकल्प उभारताना मुक्त मोबदला (फंजिबल) चटई क्षेत्र निर्देशांकासाठी बांधकाम व्यावसायिकांना प्रीमियम शुल्क (अधिमूल्य) भरावे लागते या शुल्कांत सन २०१९ मध्ये शासनाकडून २५ टक्के सवलत देण्यात आली त्यानंतर माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये या निर्णयाला वर्षभराची मुदतवाढ देत सवलत ५० टक्के केली मात्र या सवलतीचा लाभ घेणाऱ्या विकासकांनी घर किंवा फलॅट विक्री पोटीच्या

मुद्रांक शुल्क भरणा विकासकांने स्वत: करावा, असे शासनाने आदेशात म्हटले आहे विकासकांनी मात्र प्रीमियम शुल्कांची सवलत तर घेतली पण ग्राहकांचे मुद्रांक शुल्क भरलेलेच नाही ते त्यांनी ग्राहकांकडूनच वसूल केले आहे,असा आरोप मुंबई ग्राहक पंचायतचा आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकाम व्यावसायिकांनी अशाप्रकारे प्रीमियममध्ये सवलत घेतल्याचे त्यांच्या संकेतस्थळावर जाहीर करणे आवश्यक आहे, त्यानंतर ग्राहकांच्या मुद्रांक शुल्कांचा भरणा स्वत: करून ग्राहकांकडून तसे प्रमाणपत्र घ्यावे स्वत: मुद्रांक शुल्कांचा भरणा केलेल्या ग्राहकांची यादी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रकाशित करून त्यानंतर ती यादी महारेराकडेही जमा करावी असे आदेशात नमूद केलेले असतानाही एकाही विकासकाने ग्राहकांना हा लाभ दिलेला नाही. यामुळे संपूर्ण महामुंबई क्षेत्रात तीन हजार कोटी रूपयांची फसवणूक झाल्याचा प्राथमिक अंदाज मुंबई ग्राहक पंचायतने व्यक्त केला आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बांधकाम व्यावसायिकांने तीन हजार कोटी रूपयांची फसवणूक केल्याने त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०२३) :** (१)(२) व (३) मुंबई ग्राहक विकासकांनी प्रिमियम शुल्कात सवलत घेतली पण त्याचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहचला नाही, अशा आशयाचे निवेदन दिनांक ३१/०१/२०२२ रोजी अध्यक्ष, महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण यांना प्राप्त झाले आहे.

(४) ज्या विकासकांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २३/०२/२०२१ रोजीच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने अधिमुल्यामध्ये सवलत घेतली आहे, त्यांची यादी म्हाडा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रकाशीत करण्यात आली आहे. तसेच, अधिमुल्यामध्ये सवलत देतांना विकासकांकडून नोंदणीकृत हमीपत्र देखील घेण्यात आले आहे.

अधिमुल्यांच्या सवलतींचा लाभ घेणाऱ्या प्रकल्पांचे अथवा प्रकल्पांच्या ज्या भागासाठी सवलत घेतली आहे, अशा इमारतींच्या भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यापूर्वी सदर इमारतींच्या विकासकांनी दिनांक २३/०८/२०२१ रोजीच्या परीपत्रकानुसार मुद्रांक शुल्क अदा केलेल्या कागदपत्रांचे शहानिशा करून भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्याचे कार्यपध्दती महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी अवलंबलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गंगापूर (जि.औरंगाबाद) येथील नगरपरिषदेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(६) १३८७२ (२५-०८-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.औरंगाबाद) नगर परिषदेतील मुख्याधिकारी, नगर रचना सहाय्यक, बांधकाम अभियंते व लेखापाल इ. महत्वाची पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रमुख पदावरील अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने दैनंदिन कामकाज वेळेवर होत नसल्याबाबत स्थानिक नागरिकांनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बांधकाम अभियंता नसल्याने केंद्र शासनाचा महत्वकांक्षी प्रकल्प घरकुल योजनेचे काम बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गंगापूर (जि.औरंगाबाद) नगरपरिषदेतील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-०४-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे. मुख्याधिकारी, गंगापूर नगरपरिषद या पदावर दिनांक २६/०५/२०२२ रोजीच्या शासन आदेशान्वये पदस्थापना करण्यात आली आहे.
महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा संवर्गातील ५ रिक्त पदापैकी २ पदे भरण्यात आली असून, लेखापाल संवर्गातील २ रिक्त पदांपैकी १ पद अनुकंपा तत्वावर भरण्यात आले आहे.

तसेच गंगापुर नगरपरिषदेचे प्रशासकीय कामकाज सुरळीपणे चालविण्याकरीता नगरपरिषदेच्या स्थापत्य अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार स्थापत्य अभियंता, वैजापूर नगरपरिषद, तसेच नगररचना सहायक पदाचा अतिरिक्त कार्यभार नगररचना सहायक, कन्नड नगरपरिषद यांच्याकडे तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात आला आहे.
(२) अंशतः खरे आहे. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) राज्यस्तरीय संवर्गातील (सर्व) रिक्त पदे जास्त प्रमाणात असल्याने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात होणाऱ्या सर्वसाधारण बदल्यांमधून काही पदे प्रशासकीय आवश्यकतेनुसार भरण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यात सीसीटीव्ही अद्यापही न बसविल्याबाबत....

**(७) १४८१३ (२५-०८-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली (ता.पलूस) जिल्ह्यातील सीसीटीव्ही अद्याप बसविलेले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केलीआहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सीसीटीव्ही नसल्यामुळे या गावात गुन्हेगारी वाढत असल्याने गुन्हेगारांना पकडण्यांत पोलिसांना अडचणी निर्माण होत असून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०६-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) सांगली जिल्ह्यातील पलूस शहरामध्ये जिल्हा वार्षिक योजनांतर्गत १५ सीसीटीव्ही सर्व्हेलंस यंत्रणा बसविण्यात आली असून ती दिनांक १०/०३/२०२२ पासून कार्यरत आहे. पलूस शहरामध्ये सीसीटीव्ही

सर्व्हेलंस यंत्रणा बसविल्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यास मदत होत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुरुड जंजिरा (जि.रायगड) नगरपरिषद हद्दीत सी.के.पी. समाजबांधवांसाठी समाज मंदिराच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**(८) १५०५५ (०५-०९-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरुड जंजिरा (जि.रायगड) नगरपरिषद हद्दीत सी.के.पी. समाज बांधवांसाठी समाज मंदिराचे बांधकामाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, रायगड यांनी शासनाकडे सादर केला असल्याचे दिनांक २५ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे, सदरहू प्रस्तावास प्रशासकीय मान्यता आदेश देण्यासह आवश्यक निधी वितरण करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०४-२०२३) :** (१) व (२) मुरुड जंजिरा (जि.रायगड) नगरपरिषद हद्दीत सी.के.पी. समाज बांधवांसाठी समाज मंदिराचे बांधकामाच्या कामास जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक २०/१२/२०२१ च्या आदेशान्वये सदर कामास निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.
• सद्य:स्थितीत कार्यआदेश देण्याची कार्यवाही प्रस्तावित असल्याचे मुख्याधिकारी मुरुड जंजिरा यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालवण शहर (जि.सिंधुदुर्ग) येथील विद्युत ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्याबाबत

**(९) १५०७२ (३१-१०-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण शहर (जि.सिंधुदुर्ग) येथील श्री दीपक चव्हाण या ग्राहकाने निवासस्थानातील सदोष विद्युत मीटरबाबतची लेखी तक्रार उपकार्यकारी अभियंता, मालवण उपविभाग, महावितरण यांच्याकडे दि २८ मार्च, २०२२ रोजी आणि तदनंतरही वारंवार केली असतानाही आजमितीस सहा महिने इतका कालावधी होऊनही सदरहू तक्रारीची दखल संबंधित अधिकाऱ्याने घेतली नसल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालवण शहरातील विद्युत ग्राहकांच्या विद्युत वितरणाबाबत उद्‌भवत असलेल्या अनेक तक्रारींचा निपटारा विहित मुदतीत करण्यात उपकार्यकारी अभियंता, मालवण उपविभाग, महावितरण यांच्याकडून दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुषंगाने कर्तव्यात कसूर करून विद्युत ग्राहकांच्या तक्रारी विहित मुदतीत निराकरण करुन सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०२३) :** (१) हे अंशत : खरे आहे.

श्री.दिपक वसंत चव्हाण यांचा वीज बिल जास्त येत असल्याबाबतचा अर्ज महावितरणच्या मालवण उपविभागात दिनांक ३० मार्च २०२२ रोजी प्राप्त झाला होता व त्याप्रमाणे त्या दिवशी स्थळतपासणी करण्यात आली. मीटर वरील प्रत्यक्ष वापराची नोंद व रिडींगच्या दरम्यान घेण्यात आलेल्या फोटो मीटर वाचन यांच्यामध्ये तफावत आढळल्यामुळे मीटरची तपासणी करण्यात आली. मीटर मधील तांत्रिक बिघाडामुळे तफावत झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सदर ग्राहकाचे वीज देयक दुरुस्ती करुन देण्यात आले व त्यापोटी रुपये २३२२/- ची वजावट माहे नोव्हेंबर, २०२२ च्या वीज देयकातून करुन देण्यात आली. तसेच सदर ग्राहकाचे मीटर सुध्दा बदलवून देण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.

मालवण उपविभागात घरगुती ग्राहकांची २१९४३ संख्या असून या आर्थिक वर्षात जानेवारी अखेर या ग्राहकांना एकूण २४१४५० देयके देण्यात आली. यापैकी ७७३ देयकाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी ८९ ग्राहकांची देयके योग्य असल्याचे निदर्शनास आले व ६४१ ग्राहकांच्या देयकामध्ये स्थळ पडताळणी अहवालानुसार दुरुस्ती करण्यात आलेली आहे. उर्वरित तक्रारींचे निराकरण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) श्री.दिपक वसंत चव्हाण यांच्या तक्रारी नुसार बिल दुरुस्ती करीता दिरंगाई झाल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना कार्यकारी अभियंता, कणकवली यांचे दिनांक २२/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे-मुलुंड दरम्यान रेल्वे स्थानक उभारण्याबाबत

**(१०) १५१३५ (२९-१२-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व मुलुंड स्थानकातील प्रवाशांची गर्दी कमी करण्यासाठी ठाणे-मुलुंड दरम्यान मनोरुग्णालयाच्या जागेवर नवे रेल्वे स्थानक उभारण्यास रेल्वे विभागाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर स्थानकासाठी ठाणे स्मार्ट सिटी योजनेंतर्गत रुपये ११९.३२ कोटी रेल्वे विभागाला देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रेल्वे स्थानकाचा विस्तार करण्यासाठी आरोग्य विभागाने ना-हरकत दाखला दिला नसल्यामुळे रेल्वे विस्तार करण्याचे काम रखडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रेल्वे स्थानकाचा विस्तार करण्यासाठी आरोग्य विभागाने ना-हरकत दाखला देऊन ठाणे-मुलुंड दरम्यान रेल्वे स्थानक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०४-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) ठाणे मनोरुग्णालयाच्या जागेमध्ये उपनगरीय रेल्वे स्थानक बांधण्याच्या आरक्षण बदलास दिनांक १८/०२/२०२० रोजी मान्यता दिलेली अहे. तथापि, मनोरुग्णालयासंदर्भात उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ११/२०२० दाखल असल्यामुळे याबाबत न्यायालयाचे निर्देश अद्याप प्राप्त न झाल्यामुळे जागा हस्तांतरण प्रक्रिया अद्याप झालेली नाही. त्यामुळे मनोरुग्णालयामधील जागेवर नवीन उपनगरीय रेल्वे संबंधित स्थानकाचे काम अद्याप सुरू करता आले नाही, ही वस्तुस्थिती असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाच्या विविध विभागात अधिसंख्य पदावर असलेल्या अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्यांना सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत

**(११) १५५७० (०९-०१-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक १२७९८ ला दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने सी.अ.क्र. ८९२८/२०१५ व इतर (चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय विरुध्द जगदीश बळीराम बहिरा व इतर) याचिका यामध्ये दिनांक ६ जुलै २०१७ रोजी दिलेला निकाल हा फक्त संबंधित याचिके पूरता मर्यादित होता, परंतु सदर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ घेऊन दिनांक २१ डिसेंबर, २०१९ च्या शासन निर्णयाद्वारे सुमारे २५ ते ३० वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना नियमित पदावरुन अधिसंख्य पदावर वर्ग केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिसंख्य पदावर वर्ग केल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना सेवाविषयक लाभ मिळत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असून अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांनी सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवाविषयक/सेवानिवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय करण्यासंदर्भात शासनास शिफारशी करण्यासाठी दिनांक १५ जून, २०२० च्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना करण्यात आलेली असून सदर अभ्यास गटाच्या अहवालाच्या अनुषंगाने विधी व न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग व वित्त विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत काय, सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत पूर्ववत कायमस्वरूपी सामावून घेवून सर्व सेवाविषयक लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०५-२०२३) :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर,एफसीआय आणि इतर विरूध्द जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दिनांक ६/०७/२०१७ असा निर्णय दिला आहे की, अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती अथवा इतर मागासवर्ग या जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही. अशा व्यक्तींना शासकीय सेवेत दिलेले संरक्षण घटनेतील तरतूदींशी विसंगत ठरते. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी कायदेशिर अभिप्रायानुसार अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे आदेश दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.
(२), (३) व (४) दिनांक १५/०६/२०२० च्या शासन निर्णयान्वये मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या अभ्यास गटाचा अहवाल मा.मंत्रिमंडळाच्या निर्णयार्थ सादर करण्यात आला. मंत्रिमंडळाच्या दिनांक २९/११/२०२२ च्या बैठकीतील निर्णयानुसार अधिसंख्य पदावरील अधिकारी व कर्मचारी यांना मानतावादी दृष्टीकोनातून व त्यांनी केलेल्या सेवेचा विचार करुन तांत्रिक खंड देऊन पुन्हा ११ महिन्याच्या कालावधीकरीता त्यांच्या सेवा सेवानिृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरु ठेवण्याचे, तसेच पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळता सेवाविषयक व सेवानिवृत्तीविषयक लाभ देण्याबाबतचे आदेश दिनांक १४/१२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिरूर (जि.बीड) शहरातील आदर्श पत्रकार संघाच्या अध्यक्षांचा डीजेच्या कर्कश आवाजामुळे मृत्यू झाल्याबाबत

**(१२) १५५७६ (२८-१२-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-(१) शिरूर (जि.बीड) शहरातील आदर्श पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा साईराम भारत गॅस एजन्सिचे वितरक रामनाथ कांबळे यांचा नुकताच मृत्यू झाला त्यासाठी डीजेचा कर्कश आवाज जबाबदार असल्याचा आरोप ग्रामस्थानी मा.जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात केला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात शिरूर शहरातील कोणत्याही कार्यक्रमाला डीजेची परवानगी देऊ नये अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त घटनेस जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच शिरूर शहरातील कोणत्याही कार्यक्रमाला डीजेची परवानगी न

देण्यास कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही,

जयभवानी गणेश मंडळ, शिवाजीनगर शिरुर कासार जि.बीड या मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीत बँजो चा वापर केला असून डीजेचा वापर केला नाही. सदरचे विसर्जन झाल्यानंतर गणेश मंडळातील कार्यकर्त्यांसोबत जेवण केल्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याने गणेश मंडळाचे अध्यक्ष श्री.कांबळे यांचे निधन झाले आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) पोलीस ठाणे शिरुर कासार हद्दीत डि.जे. वाद्याला परवानगी देण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयातील वकिलांच्या चेंबरची संख्या वाढविण्याबाबत...

**(१३) १५८७३ (२८-१२-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयात वकिलांची संख्या सुमारे १ हजार ३३३ इतकी आहे. तर नियमीत कोर्टात येणाऱ्या वकिलांची संख्या ६७८ एवढी असून वकिलांना बसायला केवळ ४४ चेंबर उपलब्ध आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास सोलापूर जिल्हा व सत्र जिल्हा व वाढविण्यासंदर्भात वारंवार विधी व न्याय विभागाकडे मागणी करुनही गेल्या ३३ वर्षा पासून चेंबरची संख्या वाढवलेली नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयांतील वकिलांच्या चेंबरची संख्या वाढविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०३-२०२३) :** (१) होय. सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयात नोव्हेंबर, २०२२ अखेर वकीलांची संख्या ३०४४ इतकी असून त्यांनी रितसर सदस्यत्व स्विकारले आहे. तेथील प्रत्यक्षात वकिली व्यवसाय करणाऱ्या वकीलांची संख्या १४६९ इतकी झाली आहे. तसेच नव्याने नाव नोंदणी करणाऱ्या वकीलांची संख्या वाढत आहे. तथापि, उपलब्ध चेंबरची संख्या केवळ ४४ इतकी आहे.
(२) व (३) - सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयातील वकीलांची संख्या वाढत गेल्याने सोलापूर बार असोसिएशन सोलापूर यांनी विशेष सभेद्वारे ठराव करुन २०१४ मध्ये सोलापूर बार असोसिएशन लॉयर्स चेंबर्स कन्स्ट्रक्शन कमिटी स्थापन केली व नियोजित नवीन ४८ चेंबरच्या बांधकामासाठीचा प्रस्ताव तयार केला आहे. सदर प्रस्ताव बांधकाम परवान्याकरीता सोलापूर महानगर पालिका, सोलापूर याच्यांकडे दिनांक १८/०२/२०१४ रोजी पाठविण्यात आला आहे. सोलापूर महानगर पालिका यांनी दिनांक २०/०२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये याबाबतची कागदपत्रे, जागेचा चालू टॅक्स, कर भरणा केल्याचा ना- हरकत दाखला, दुरुस्त नकाशे, जिल्हाधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र इ. सादर करण्याबाबत सोलापूर बार असोसिएशन यांना सूचित केले होते. दरम्यानच्या काळात कोविड-१९ च्या महामारीमुळे याबाबतचा पाठपुरावा थांबला

होता.आता दिनांक २०/११/२०२२ पासून सोलापूर बार असोसिएशनचा पाठपुरावा चालू आहे. तथापि, याबाबत कोणताही प्रस्ताव अद्याप शासनाकडे प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर मेट्रो मधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना केंद्रीय वेतन आयोगाच्या वेतन पध्दती पासून वंचित ठेवल्याबाबत

**(१४) १५८९७ (२७-१२-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर मेट्रोमध्ये सफाई कर्मचारी, सुरक्षारक्षक तथा अन्य तत्सम पदांवर अंदाजे ११०० कर्मचारी कार्यरत असून उपरोक्त कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या वेतन आयोगानुसार वेतन अदा केले जात नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कर्मचाऱ्यांना पूर्व कल्पना न देता तसेच मार्च २०२२ च्या केंद्रीय कामगार आयुक्तांच्या निर्णयाची अंमलबजावणी न करता राज्य शासनाच्या वेतन आयोगानुसार वेतन अदा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन नियमांचे उल्लंघन करुन वेतन अदा करण्यात येत असल्यामुळे कामगारांवर अन्याय होत असल्याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी तक्रार, निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कामगारांना केंद्राच्या वेतन धोरणानुसार वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०४-२०२३) :** (१)(२), (३), (४) व (५) होय हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या किमान वेतन कायदा १९४८ च्या कलम २(ब) नुसार महामेट्रोकरीता समुचित शासन राज्य सरकार असल्याने तसेच महा मेट्रोच्या संचालन व देखरेख तसेच कर्ज परत फेडीचा आर्थिक भाग राज्य शासनास उचलायचा असल्याने नागपूर मेट्रो मध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या किमान वेतन ऐवजी राज्य शासनाच्या किमान वेतन अदा करण्यात येते. या विरोधात कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वतीने कामगार प्रवर्तन अधिकारी यांनी विभागीय कामगार आयुक्त (केंद्रीय) यांचेकडे दावा दाखल केला असून विभागीय कामगार आयुक्त (केंद्र शासन) यांनी केंद्र सरकारच्या अधिसूचित दराप्रमाणे वेतन देण्याबाबत महा मेट्रोला दिनांक २२/०२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये निर्देश देण्यात आले आहे.
तसेच महा-मेट्रोद्वारे केंद्रीय विभागीय आयुक्त यांच्या दिनांक २२/०२/२०२२ चे आदेशाचे पुनर्विलोकन करण्याची विनंती दिनांक १७/०३/२०२२ रोजी केली असून सदर अर्ज दिनांक २१/१०/२०२२ रोजी अर्ज नाकारण्यात आला आहे.

तद्नंतर, महा-मेट्रोद्वारे केंद्रीय विभागीय कामगार आयुक्त यांचे दिनांक २२/०२/२०२२ व २१/१०/२०२२ रोजीच्या आदेशा विरुध्द दिनांक २२/११/२०२२ रोजी महा मेट्रोद्वारे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट यांचिका क्र WP/७५५६/२०२२ दावा दाखल करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

## धनगर समाजाचा अनुसूचित जातीत समावेश करण्याबाबत

**(१५) १५९२१ (२८-१२-२०२२) श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने धनगड म्हणजेच धनगर असल्याचे जाहीर करावे तसेच, धनगर समाजाला भटक्या जमातीचे आरक्षण न देता त्यांचा समावेश अनुसूचित जातीत करावा अशी मागणी धनगर समाजाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीसाठी धनगर समाज सातत्याने आंदोलन करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने "टिस" या संस्थेने सादर केलेल्या अहवालावर मा.महाधिवक्ता यांचे अभिप्राय प्राप्त होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१७-०३-२०२३) :** (१) व (२) धनगर समाजाचा समावेश अनुसूचित जमातीत करण्याबाबतची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३) मा.मंत्रिमंडळ उप समितीने दिलेल्या निर्देशानुसार टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांनी सादर केलेल्या धनगर समाजाच्या अहवालाबाबतची नस्ती महाधिवक्ता यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक २६/०३/२०१९ रोजी विधी व न्याय विभागास सादर करण्यात आली होती. तद्नंतर सदर नस्ती विधी व न्याय विभागामार्फत दिनांक ०४/१०/२०१९ रोजी मा.महाधिवक्ता यांच्याकडे अभिप्रायार्थ सादर करण्यात आली होती. तथापि, सदर नस्ती फेब्रुवारी, २०२३ मध्ये विशिष्ट अभिप्रायाशिवाय विभागास प्राप्त झाली. सध्या सदर प्रस्ताव पुढील निर्णयास्तव वरिष्ठ पातळीवर शासनास सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याणमधील औद्योगिक वसाहतीमध्ये ॲल्युमिनियम फ्रेम कोटींग (अनोडायझिंग) करणाऱ्या कारखान्यामध्ये वीज चोरी होत असल्याबाबत

**(१६) १६५२४ (२८-१२-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याणमधील औद्योगिक वसाहतीमध्ये ॲल्युमिनियम फ्रेम कोटींग (अनोडायझिंग) करणाऱ्या कारखान्यामध्ये लाखो रुपयाची वीज चोरी होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कंपनीकडून सदर कंपनीला ४ लाख ८० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आलेल्या दंडाची रक्कम न भरल्यामुळे महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने कल्याण औद्योगिक वसाहतीमध्ये जोडणी केलेल्या वीज मिटरची तपासणी करुन वीज चोरी करणाऱ्या कारखान्यांना देण्यात आलेल्या परवानग्या व सवलती रद्द करुन कारखाना मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

कोकण परिक्षेत्र सुवअं विभाग अंतर्गत असलेल्या भरारी पथक कल्याण-२ यांनी दिनांक २१/०९/२०२२ रोजी श्री.जुमीन निजामुद्दीन जलाल या औद्योगिक ग्राहकाची (ॲल्युमिनियम फ्रेम कोटींग (अनोडायझिंग) कारखाना) विद्युत जोडणीची तपासणी करुन वीजचोरी उघडकीस आणलेली आहे.
(२) हे खरे आहे.

ग्राहकास एकूण ९५२२९ युनिटचे रुपये १७,०८,१५०/- इतक्या रुपयांचे वीजचोरीचे बिल देण्यात आले आहे व ग्राहकाने सदर वीजचोरी बिलाचा भरणा न केल्यामुळे ग्राहकावर विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १३५ अंतर्गत गुन्हा क्र.०५६१, दिनांक ३०/०९/२०२२ रोजी कल्याण पश्चिम येथील महात्मा फुले पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागरी जमीन धारणा कायदा व विनिमय अधिनियम १९७६ अंतर्गत कलम २० अन्वये जमीन फ्री होल्ड प्रॉपर्टी करण्याबाबत

**(१७) १६६०२ (२९-१२-२०२२) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागरी जमीन कमाल धारणा कायदा व विनिमय अधिनियम १९७६ हा कायदा रद्द झाल्यानंतर या अधिनियमाच्या कलम २० अन्वये रेडीरेकनरच्या १५ टक्के रक्कम भरुन या अंतर्गत येणारी जमीन सन २०१९ च्या शासन निर्णयानुसार फ्री होल्ड प्रॉपर्टी करता येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अधिनियमाच्या अंतर्गत राज्यात असणाऱ्या नऊ ठिकाणच्या जमिनींपैकी किती जमिनी सन २०१९ च्या शासन निर्णयानुसार रेडीरेकनरच्या १५ टक्के रक्कम भरुन फ्री होल्ड करण्यात आल्या आहेत,
(३) तसेच या अधिनियमांतर्गत येणाऱ्या किती जमिनींना कलम २० अन्वये परवानगी न घेता हस्तांतरित अथवा विकसित करण्याकरीता बांधकाम परवानगी मिळाली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागरी जमीन कमाल धारणा कायदा व विनिमय अधिनियम १९७६ अंतर्गत कलम २० अन्वये पैसे न भरता बांधकाम परवानगी देणाऱ्या संबंधित संस्था अथवा व्यक्तीवर कारवाई करुन बुडालेला महसूल संबंधित कंपनी अथवा व्यक्तिकडून वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, येणार आहे का,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०४-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या कलम २० अन्वये विविध प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या जमीनींबाबत शासन निर्णय दिनांक १/०८/२०१९ अन्वये सर्व समावेशक धोरण निश्चित केले असून, सदर शासन निर्णयानुसार औद्योगिक प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या प्रकरणी सूटीच्या आदेशामध्ये नमूद एकूण क्षेत्रासाठी (कोणत्याही वजावटीशिवाय आदेशामध्ये नमूद असलेले महत्तम क्षेत्र) प्रचलित वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यामधील दराच्या १५ टक्के दराने येणारे अधिमुल्य एकरकमी आकारून असे क्षेत्र संबंधित विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकसनासाठी उपलब्ध करुन देण्यात येते.

(२) नागरी जमीन कमाल (धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या कलम २० अन्वये औद्योगिक प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या एकूण प्रकरणांपैकी ९ नागरी समुहांमध्ये आजतयागत ६५ प्रकरणात शासन निर्णय दिनांक १/०८/२०१९ मधील तरतूदीनुसार ८,३५,९८८.५२ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरीता एकूण रुपये ४१५,२८,५४,६१५/- इतकी रक्कम अधिमुल्य म्हणून वसूल करण्यात आले आहे.

(३) व (४) नागरी जमीन कमाल (धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या कलम २० खाली मंजूर करण्यात आलेल्या सर्व योजनेखालील क्षेत्राच्या ७/१२ उताऱ्यावर "नाजकधा कलम २० च्या योजनेखालील क्षेत्र" म्हणून नोंद घेण्याबाबत शासन पत्र दिनांक १/१२/२००८ अन्वये सर्व नागरी समुहांच्या सक्षम प्राधिकाऱ्यांना निदेश देण्यात आले आहेत. तसेच शासन स्तरावरून दिनांक २८ नोव्हेंबर, २००७ नंतर देण्यात आलेल्या सुचना तसेच विविध शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली धोरणे विचारात घेऊन अर्जदारांच्या विनंती अर्जावर कार्यवाही करण्याबाबत, जमीनधारक / भूखंडधारक व विकासक यांच्या अर्जावर शासनाचे धोरण व सूचना विचारात घेऊन तसेच शासनाच्या महसूलाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेऊन निर्णय घेण्यात घेण्याबाबत, तसेच काही मुद्यांच्या अनुषंगाने काही संदिग्धता असल्यास शासनाची मान्यता घेवून कार्यवाही करण्याबाबत सर्व नागरी समुहांच्या जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी तसेच संबंधित महानगरपालिकेचे आयुक्तांना शासन परिपत्रक दिनांक २८/०४/२०२२ अन्वये निदेश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यात स्थापण्यात येणाऱ्या सल्लागार समितीबाबत.

**(१८) १६८२६ (२८-१२-२०२२) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध विकासकामांचे प्रकल्प प्रलंबित राहू नये यासाठी प्रकल्पांबाबत निर्णय घेण्यासाठी " राज्यात सल्लागार समितींची" स्थापना करण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विकास कामे जलद गतीने होण्यासाठी राज्य सल्लागार समितीची लवकरात लवकर स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) समितीच्या सदस्यांची नेमणूक करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील संजय गांधी निराधार अनुदान महत्वकांक्षी योजना तर्पण फाऊंडेशनकडे सोपविण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(१९) १७८९१ (२५-०३-२०२३) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील संजय गांधी निराधार अनुदान महत्वकांक्षी योजना शासनाने एका लोकप्रतिनिधीच्या तर्पण फाऊंडेशन या संस्थेकडे सोपविण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात इतरही सार्वजनिक संस्था कार्यरत असताना शासकीय योजना तर्पण फाऊंडेशन या संस्थेकडे दिल्यामुळे सदर योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संजय गांधी निराधार अनुदान योजना तर्पण फाऊंडेशनकडे सोपविण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.एकनाथ शिंदे (२६-०४-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) महसूल व वन विभागाकडून प्राप्त प्रस्तावानुसार संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील पात्र अनाथ मुलांना योजनेचा लाभ मिळण्याच्या संदर्भात तर्पण फाऊंडेशन या संस्थेसोबत त्रिपक्षीय करारनामा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर संस्था अनाथ मुलांच्या उत्थानासाठी कार्यरत असून राज्यभरातील पात्र अनाथ मुलांना योजनेचा लाभ मिळावा यासाठी शासनाकडून कोणताही स्वरुपाचा आर्थिक मदतीशिवाय तर्पण ही संस्था कार्य करणार आहे.

---

## राज्यातील डोंगराळ भागाच्या विकासासाठी योजना राबविण्याबाबत

**(२०) १८४४५ (२५-०३-२०२३) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील डोंगराळ भागांचा विकास करण्यासाठी शासनातर्फे योजना राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डोंगराळ विभागाचा विकास करण्यासाठी नव्याने क्षेत्र निश्चित करून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा.ग्रामविकासमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उपसमितीने सद्य:स्थितीत किती जिल्हे व तालुक्यांचा डोंगराळ विभाग विकास कार्यक्रमात समावेश केला आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील डोंगराळ भागांचा विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) (५) डोंगरी तालुक्यांचा समावेश करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर (MRSAC) यांनी Digital Elevation Model (DEM) या अत्याधुनिक तंत्रज्ञानच्या सहाय्याने तयार केलेल्या नकाशाच्या आधारे काही तालुक्यांचा "डोंगरी विभाग विकास कार्यक्रमात" समावेश करण्याबाबतचा निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळ उप समितीच्या शिफारशी प्राप्त करुन त्याआधारे या कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव -१ (का.),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.